पुण्य नगरी ■ सोमवार, ३० जानेवारी २०१७ ■ नागपूर

# तिरपुडे समाजकार्य महाविद्यालय

तिरपुडे समाजकार्य महाविद्यालयात युगांतर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजकुमार तिरपुडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संस्थेचे सरचिटणीस वामनराव कोंबाडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. एस. पाटील उपस्थित होते. अतिथींनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. एस. पाटील यांनीही विद्यार्थ्यांशी संवाद साधला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकारी डॉ. अरुणा गजभिये, प्रा. सचिन हुंगे, डॉ. दीपक मसराम, डॉ. विजय शिंगणापुरे, डॉ. विवेक अवसरे यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख व प्राध्यापक, शिक्षक, विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.